## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार**
**क्र. रामाआ/तक्रार/५७९/२०२२/नाशिक/शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. विठोबा लच्छिराम द्यानद्यान,<br>रा.स.नं.१९६, प्लॉट नं.१०५/५, जे.डी.स्टील, श्रमिक नगर, नाशिक-४२२०१२. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टोकडे, ता.मालेगाव, जि.नाशिक. |

**विवेचन**

तक्रारदार यांनी दि.०५/११/२०२२ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

> "१९९० ते आजपर्यंत या कालावधीतील मौजे टोकडे, ता.मालेगाव, जि.नाशिक या ग्रामपंचायतीचे १. एकूण खाते उघडण्याच्या संख्येचा तपशिल, २. चालु असलेल्या खात्याच्या पासबुकांची सुरुवाती पासुन आजपर्यंत संपूर्ण पानांची (स्टेटमेंट) प्रत, २. बंद केलेल्या खात्याची सुरुवातीपासून खाते बंद करेपर्यंत पासबुक पानांची (स्टेटमेंट) प्रत. उपरोक्त तीनही मुद्यांची माहिती आरटीआय लोगोसह नंबरींगसह प्रमाणित करुन मिळावी."

तक्रारदार यांनी माहिती न मिळाल्याने दि.०७/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी विनिर्दिष्ट मुदतीत माहिती दिली नाही. माहिती देण्यास नकार दिला. सबब त्यांच्यावर कलम २०(१) नुसार शास्ती लावण्यात यावी. तसेच कलम २०(२) नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार मला झालेल्या शारीरिक, मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळावी." असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दि.०७/१२/२०२२ रोजी दाखल केलेल्या उपरोक्त तक्रार क्र.५७९/२०२२/नाशिक संदर्भात आयोगाने दिनांक २३/०२/२०२४ रोजी सुनावणीअंती पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

> "तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टोकडे, यांनी पालन केले नाही, म्हणून त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी."

२. प्रस्तुत तक्रार संदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, अपिलार्थी यांच्या दि.०५/११/२०२२ रोजीच्या माहिती अर्जांच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टोकडे, ता.मालेगाव, जि.नाशिक, यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच आयोगाने दि.२३/०२/२०२४ च्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार कोणताही लेखी खुलासा देखील आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे याप्रकरणी त्यांचे

काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टोकडे, ता.मालेगाव, जि.नाशिक, (दि.०५/११/२०२२ रोजी कार्यरत) यांनी आयोगाच्या दि.२३/०२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार कोणताही खुलासा सादर केलेला नसल्याने, उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभुमीवर आयोगाच्या मते त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये रुपये १०,०००/-(दहा हजार रुपये मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक, यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टोकडे, ता.मालेगाव, यांच्या वेतनातून कपात करुन सदर रकमेचा भरणा "००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१)(१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)" या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) वरील आदेशासह प्रस्तुत तक्रार क्र.५७९/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

दिनांक:-

ठिकाण:-

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक.

जावक क्र. ८३०८ 11 NOV 2025